## यश ढाका हत्याप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

# अन्यायाच्या विरोधात न्यायाची लढाई









## माणुसकीची हत्या न्याय पाहिजे!

बीड । दिव्य न्युज

येथील यश ढाका हत्याप्रकरणी मास्टर माईंडला आरोपी करा इतर आरोपींना अटक करा, एसआयटी स्थापन करा यासह विविध मागण्यासाठी आज सोमवारी (दि.३) सकाळी ११ वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून मोर्चाला सुरुवात करुन जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी हजारो आंदोलक यश ढाका अमर रहे, पोलीस प्रशासन न्याय द्या, बीडमधील गुन्हेगारी कमी करा मागणीचे फलक घेऊन आंदोलक मोर्चात सहभागी झाले होते. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल्यानंतर मागण्यांचे निवेदन देण्यात आले. तसेच मागण्याची दखल न घेतल्यास मंत्रालयावर मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे. या मोर्चात आ. संदीप क्षीरसागर, माजी आ. सय्यद सलीम, अजिंक्य चांदणे आदी सहभागी झाले होते.

## पोलीस प्रशासन न्याय द्या, बीडमधील गुन्हेगारी कमी करा मागणीचे फलक घेऊन आंदोलक मोर्चात सहभागी





दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ८ ते साडेआठच्या दरम्यान शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात यश देवेंद्र ढाका याची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या प्रकरणी चार आरोपी अटक करण्यात आले असून यातील मास्टरमाइंड व कट रचणारा गणेश गोरख शिराळे अद्यापही फरार आहे. पोलिसांना वारंवार विनंती करूनही गणेश शिराळे यास अद्यापही आरोपी न करता पोलीस विभाग या गंभीर प्रकरणाकडे दुर्लक्ष करत आहे असा आरोप करण्यात आला. या प्रकरणाकडे लक्ष वेधण्यासाठी आज सोमवारी ( दि.३) जन आक्रोश मोर्चाच्या माध्यमातून सामान्य बिडकर न्यायाच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरला होता. यावेळी मोर्चात प्रशासनाच्या विरोधात मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करण्यात आली. तर मास्टर माइंड गणेश शिराळे यास तात्काळ अटक करून गुन्हा नोंद करण्यात यावा, यश ढाका खून प्रकरणातील सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी, हा खटला अंडर ट्रायल चालविण्यात यावा, विशेष सरकारी वकीलाची नियुक्ती करण्यात यावी, यश ढाका यांच्या कुटुंबियास पन्नास लाख रुपये आर्थिक मदत करण्यात यावी, परिवारातील एका सदस्याला शासकीय नोकरी देण्यात यावी. फरार आरोपींना लवकरात लवकर अटक करावी, या घटनेच्या तपासासाठी विशेष तपास पथक (एस.आय.टी) स्थापन करावी या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. मोर्चात मोठ्या प्रमाणात महिला व नागरिक सहभागी झाले होते. तात्काळ विचार न झाल्यास जन आक्रोश मोर्चा नंतर विभागीय स्तरावर व यानंतर मंत्रालयावर न्यायाच्या मागणीसाठी भव्य स्वरूपाचे आंदोलन उभा करण्यात येईल याची गंभीर दखल जिल्हा प्रशासनाने घ्यावी असा इशारा देण्यात आला. या मोर्चामध्ये ढाका कुटुंबासह महिला, पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सकाळी ११ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून हा मोर्चा निघून माळी वेस चौक, सुभाष रोड, साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी तगडा बंदोबस्त ठेवला होता.

## पाटोदा शहरात मोकाट कुत्र्यांचा उच्छाद; नागरिकांत भीती:नगर पंचायत प्रशासनाने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अन्यथा शहरवासीयांकडून आंदोलन केले जाणार



पाटोदा । दिव्य न्युज

पाटोदा शहरात सध्या मोकाट कुत्र्यांचा उच्छाद माजला असल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्त्यांवर, चौकात आणि सरकारी कार्यालयासमोर या मोकाट कुत्र्यांचे घोळके बसलेले दिसतात. लहान मुले, महिला आणि वृद्ध नागरिकांमध्ये रस्त्याने ये-जा करीत असताना या मोकाट कुत्र्यांची भिती निर्माण झाली आहे.

शहरातील महासांगवी रस्ता, वसंतदादा पाटील महाविद्यालय परिसर, तहसील कार्यालय, पंचायत समिती व अगदी नगरपंचायत कार्यालयासमोरसुद्धा मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. हे कुत्रे रस्त्याने जाणाऱ्यांवर केंव्हाही हल्ला करु शकतात. यामुळे नागरीकांना अक्षरश: जीव मुठीत धरुन ये-जा करावी लागत आहे. शाळा, महाविद्यालयांमध्ये ये-जा करणार विद्यार्थी, जेष्ठ नागरीक , लहान मुले यांना ही मोकाट कुत्रे चावा घेत आहेत. यामुळे शहरातील नागरिकांमध्ये सदरील मोकाट कुत्र्यांची भिती निर्माण झाली आहे. नगरपंचायतीने गतवर्षी परराज्यातील पथक बोलावून या कुत्र्यांचा बंदोबस्त केला होता. तरी देखील पाटोदा शहरात सध्या मोकाट कुत्र्यांच्या संख्येत लक्षणिय वाढ झालेली दिसत आहे. त्यामुळे नगर पंचायतीने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त केल्याचा दावा फोल ठरला असून नगर पंचायतीची कार्यवाहीही कागदोपत्रीच असल्याचे दिसुन येत आहे. नगर पंचायत प्रशासनाने पुन्हा एकदा ठोस उपाययोजना करावी अशी मागणी नागरीकांकडून करण्यात येत आहे. मोकाट कुत्र्यांच्या हल्लयात लहान मुलांचा जीव गेल्याच्या घटना काही दिवसांत घडल्या आहेत. अशा प्रकारच्या घटना होऊ नयेत यासाठी प्रशासनाने वेळेत उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणार श्वानांच्या बंदोबस्तासाठी मागवलेल्या पथकाचे काही देयक प्रलंबित आहे. मात्र, सध्या श्वानांचा त्रास वाढला असल्याने पुन्हा एकदा याबाबत कार्यवाही करण्याचे प्रयत्न सुरू करू, -अभयकुमार जोशी, मुख्याधिकारी नगरपंचायत

## खबर पीक पाण्याची : लांबलेला पाऊस अन् गायब झालेला हिवाळ

जालना । दिव्य न्युज

हवामान बदलाचा शेती क्षेत्राला किती मोठा फटका बसतो, याचा अनुभव सध्या राज्यातील शेतकरी घेत आहेत. सुमारे दीडशे लाख हेक्टर वरील खरीप पिकाचे मातेरे झाल्यानंतर आता रब्बी हंगामातील पिकावर सुद्धा अवकाळी पावसाचे सावट निर्माण झाले आहे. त्यामुळे शेती करावी की, करू नये असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावतो आहे. इतकी गंभीर परिस्थिती हवामान बदलाने शेती क्षेत्रा पुढे निर्माण झाली आहे.

राज्यातील खरीप हंगामात साधारणता: दीडशे लाख हेक्टरवर पेरणी होते. हे क्षेत्र प्रामुख्याने पावसावर अवलंबून असते. राज्याच्या विविध भागात मोठ्या प्रमाणावर खरीप पिके घेतली जातात, त्यात सोयाबीन, कापूस आणि मका ही महत्त्वाची पिके आहेत. यंदा अतिवृष्टीमुळे राज्याच्या बहुतेक भागातील सोयाबीनचे मोठे नुकसान झाले आहे, तर विदर्भ मराठवाड्यातील कापसाला अतिवृष्टीचा फटका बसला आहे. मूग मटकीसह अन्य कडधान्यांची अवस्था यापेक्षा वेगळी नाही.



राज्यातील १५० लाख हेक्टर पैकी सुमारे ७० लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्यामुळे सरकारला सुमारे ३१ हजार कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी लागली. इतके गंभीर आव्हान आहे. सरकारी मदत अत्यंत तुटपुंजी आहे. त्यामुळे प्रत्यक्षातील मदत आणि शेतकऱ्यांना सहन करावा लागलेला तोटा हजारो कोटींच्या घरात जातो. या नुकसानीतून शेतकरी वर घेईल की नाही, तो कधी घेईल आणि कशाप्रकारे घेईल ? सरकार त्याला कशी मदत करेल, हे प्रश्न अनुत्तरित अनुत्तरीत असतानाच लांबलेल्या पावसाने नाकीनऊ आणले आहे. हा पाऊस कधी संपणार किंवा पावसाळा संपला की, नाही असा प्रश्न लहान थोर विचारू लागले आहेत.

अवकाळी पावसाने, महापुराने कोकण किनारपट्टीवर फारसे नुकसान झाले नव्हते. पण ऑक्टोबर महिन्याचा शेवट आणि नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे किनारपट्टीवरील भात पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. मुळात किनारपट्टीवर भात हे मुख्य पीक आहे आणि या पिकाचे नुकसान झाले तर किनारपट्टीवरील शेतकरी पुरता मोडून जातो, हे उघड सत्य आहे. भात कापणीच्या अंतिम टप्प्यात असताना पाऊस पडत असल्यामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान मोठे आहे. संपूर्ण किनारपट्टीवर पडत असलेल्या पावसामुळे भात कापणीला अडचणी येत आहेत. कापून जमिनीवर पडलेल्या भाताला सततच्या पावसामुळे कोंब फुटले आहेत, काही भात काळा पडला आहे. ज्याच्याकडे भात झाकून ठेवण्याची सोय आहे, तोही भात काळा पडल्याचे दिसून येत आहे. एकूणच राज्यातील खरीप हंगामावर पुरते पाणी पडलं असं म्हटलं तर ठरणार नाही.

## एकता दौडमध्ये शेकडो आष्टकर धावले

### छत्रपती शिवाजी महाराज चौकात झाला दौडचा समारोप

आष्टी । दिव्य न्युज

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी सकाळी ६ वाजता आष्टी शहरात आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या एकता दौडमध्ये शेकडो आष्टीकरांनी सहभाग घेतला. एक भारत-श्रेष्ठ भारतच्या घोषणांनी शहर दुमदुमले.



शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात अभिवादन झाल्यांनतर सकाळी सहा वाजता एकता दौडला सुरुवात झाली. क्रांतिसूर्य महात्मा फुले चौक, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात दौडचा समारोप करण्यात आला.

या दौडमध्ये विविध शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, शासकीय कार्यालयांतील कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी बोलताना आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, सरदार पटेल यांनी भारताच्या एकतेसाठी आयुष्य समर्पित केले. त्यांच्या कार्यातून आपण सर्वांनी एकता, बंधुता आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश घेण्याची गरज आहे.

यावेळी पोलिस निरीक्षक शरद भुतेकर, सहायक पोलिस निरीक्षक मंगेश साळवे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, भाजपा तालुकाध्यक्ष अनिल ढोबळे, गणेश शिंदे, नगराध्यक्ष जिया बेग, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, रंगनाथ धोंडे, नगरसेवक सुरेश वारंगुळे, नगरसेवक शरीफ शेख, ॲड. बाळासाहेब मोरे, नगरसेवक बाळासाहेब घोडके, नगरसेवक इर्शान शेख, आत्माराम फुंदे, टायगर अकॅडमी, बाबाजी अकॅडमी आदी उपस्थित होते.

## राज्यात रक्ततुटवडा! गर्भवती महिलांसाठी परजिल्ह्यातून आणावे लागते रक्त

औरंगाबाद । दिव्य न्युज

राज्यात सध्या रक्ताचा प्रचंड तुटवडा असून, मागणीच्या तुलनेत ६० टक्केच रक्ताचा साठा उपलब्ध आहे. जेमतेम साठ्यावर गरज भागवली जात आहे. राज्य रक्त संक्रमण परिषदेकडून मिळालेल्या माहितीनुसार राज्यात ३३ हजार ७३९ युनिट तर मुंबईत ४ हजार ६२६ एवढाच साठा उपलब्ध आहे. रक्ताचा साठा वाढवून उपलब्धता करण्यासाठी 'वाढदिवस साजरा' करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रसूतीसाठी आलेल्या महिलांमधील रक्त प्रथिनांची (हिमोग्लोबिन) कमतरता पाहता त्यांना तातडीने



पुरवठा करण्यासाठी रक्त वेळेत उपलब्ध नसल्याची परिस्थिती शासकीय वैद्यकीय रुग्णालयांमध्ये असून, बहुतांशवेळा पुणे, अहिल्यानगर, जालना येथून आवश्यक त्या रक्तगटाची पिशवी मागवावी लागत आहे. सध्या शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचाही सुटीकाल सुरू असून, उद्योग क्षेत्र आणि उद्योजक संघटनांकडूनही आयोजित करण्यात येणारे रक्तदान शिबिरे थांबली आहेत. दिवाळीसारख्या उत्सवाच्या सुटी काळात अनेक जण पर्यटनावर गेलेले आहेत. शिबिरांसाठी दातेही उपलब्ध होत नाहीत. दिवाळीपूर्वीच्या गणपती, नवरात्रोत्सव, तत्पूर्वीच्या १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरच्या कालावधीतही रक्तदान शिबिरांचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात आले होते. या कालावधीत रक्तदान केलेले दाते पुन्हा नोव्हेंबरमध्ये रक्तदान करू शकत नाही. तीन महिन्यात रक्तदान करता येत नाही. अशा काही कारणांमुळे रक्तदान शिबिरांची संख्या घटली असून, दात्यांना गरजेनुसार फोन करून आवाहन केले जात असल्याचे रक्त तुटवड्यामागचे कारण रक्तपेढ्यांमधून सांगितले जात आहे.

**प्रसूतीच्या आठ टक्के महिलांना गरज**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (घाटी) प्रसूतीसाठी आलेल्यांपैकी आठ टक्के महिलांना रक्त चढवण्याची गरज असते. काही महिलांमध्ये पांढऱ्या पेशींची कमतरता असते. प्लाझ्माची अडचण असते. दररोज ६० ते ७० महिला प्रसूतीसाठी दाखल होतात. त्यातील दहा महिलांची प्रकृती गंभीर असते. त्यांना रक्तांची गरज असते. विशिष्ट गटाचे रक्त अहिल्यानगर, जालना येथून मागवावे लागले. - डॉ. एस. एन. गडाप्पा, प्रमुख, प्रसूती विभाग, घाटी.

दरवर्षी नोव्हेंबरमध्ये रक्ताचा तुटवडा जाणवतो. राज्यात ३३ हजार ७३९ युनिट तर मुंबईत ४ हजार ६२६ एवढा उपलब्ध साठा आहे. आणखी साठा अपेक्षित आहे. सुट्टीकालामुळे शिबिरे थांबलेली असली तरी रक्तदान करून वाढदिवस साजरा करण्याविषयीचे आवाहन एका पत्राद्वारे करण्यात आले आहे. - डॉ. पुरुषोत्तम पुरी, सहायक संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद.

५४ हजार 'लाडक्या बहिणींचा' समावेश; बीडमध्ये सर्वाधिक मतदार वाढले, नव्या मतदारांसोबत इच्छुकांचा संपर्क वाढला

# १ लाख मतांची 'गुगली': कोणाची घेणार 'विकेट'?

दिव्य वार्ता

बीड । दिव्य न्युज

आगामी नगर पालिका निवडणुकांच्या अनुषंगाने प्रशासनाकडून तयारी पूर्ण झाली आहे. ३१ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध झाल्यानंतर मतदार संख्या १ लाखाने वाढल्याचे समोर आले आहे. या वाढलेल्या मतदारांमध्ये ५४ हजार महिला मतदारांचा समावेश आहे. हे मतदार प्रस्थापितांना धक्का देणार की, नवख्यांवर विश्वास ठेवणार, हे निवडणूक निकालानंतरच समजणार आहे. सध्या तरी या वाढलेल्या 'गुगली' (नव्याने वाढलेले) मतदारांसोबत इच्छुक नेते संपर्क साधत असल्याचे दिसत आहे.

बीड, अंबाजोगाई, माजलगाव, गेवराई, परळी आणि धारूरमध्ये पालिका निवडणुका आहेत. प्रभागरचनेनंतर आलेल्या ९ हजारांहून अधिक आक्षेपांची पडताळणी करून प्रशासनाने अंतिम मतदार याद्या प्रकाशित केल्या. गत निवडणुकीच्या तुलनेत यंदा १ लाख मतदार नव्याने वाढले आहेत. या मतदारांसोबत ५४ हजार लाडक्या बहिणींचा समावेश असल्याने हे नवीन मतदार कोणाला कौल देणार, याकडे लक्ष लागले आहे. राजकीय मैदानात ही एक मोठी अनपेक्षित चाल (गुगली) ठरण्याची शक्यता आहे.

### जिल्ह्यातील सहा नगरपालिकांमधील मतदार संख्या

| नगरपालिका | एकूण मतदार संख्या (२०१६) | | | | एकूण मतदार संख्या (२०२५) | | | | वाढलेली एकूण मतदार संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्त्री | पुरुष | इतर | एकूण | स्त्री | पुरुष | इतर | एकूण | स्त्री | पुरुष | इतर | एकूण |
| बीड | ५८२११ | ६७७४५ | ३ | १२५९५९ | ८६९६८ | ९३६७९ | ११ | १८०६५८ | २८७५७ | २५९३४ | ८ | ५४६९९ |
| अंबाजोगाई | २४९३१ | २७१८४ | ३ | ५२११८ | ३२५८६ | ३३६०९ | ४ | ६६१९९ | ७६५५ | ६४२५ | १ | १४०८१ |
| परळी | ३०६९५ | ३५५६४ | ० | ६६२५९ | ३८५०५ | ४०९७२ | ३ | ७९४८० | ७८१० | ३०६९५ | ३ | १३२२१ |
| माजलगाव | १५८३० | १७७०१ | ० | ३३५३१ | २०१५४ | २०७२६ | १ | ४०८८१ | ४२९४ | ३०२५ | १ | ७३५० |
| गेवराई | ११३२७ | १२०६९ | १ | २३३९७ | १४९४४ | १५२१४ | ३ | ३०१६१ | ३६१७ | ३१४५ | २ | ६७६४ |
| धारूर | ७५२८ | ८४०६ | ० | १५९३४ | ९७४३ | १०३९५ | ० | २०१३८ | ११४५ | ११८९ | ० | ४२०४ |
| एकूण | १४८५२२ | १६८६६९ | ७ | ३१७११८ | २०२९०० | २१४५९५ | २२ | ४१७५१७ | ५४३७८ | ४५९२६ | १५ | १००३१९ |







## पुरुषांपेक्षा महिला मतदार वाढले अधिक

२०१६ च्या तुलनेत २०२५ मध्ये एकूण मतदारांमध्ये पुरुषांची संख्या अधिक असली तरी, वाढलेल्या मतदारांमध्ये महिलांची संख्या लक्षणीय आहे. आकडेवारीनुसार, पुरुष ४५ हजार, तर महिला ५४ हजार मतदार वाढल्या आहेत. इतर मतदार देखील १५ ने वाढले आहेत. महिला मतदारांची ही मोठी वाढ आगामी निवडणुकीत उमेदवारांचे भवितव्य ठरवण्यात निर्णायक ठरू शकते. महिला मतदारांना आपल्याकडे खेचण्यासाठी इच्छुकांना विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत.

## पाणी, वीज, रस्त्यांच्या समस्यांवर लक्ष

बीडच नव्हे तर सर्वच सहाही शहरांमध्ये वीज, पाणी, रस्ते, स्वच्छता आदी सोयी-सुविधांचे प्रश्न कायम आहेत. वर्षानुवर्षे ठराविक लोकांकडे सत्ता असूनही त्यांना शहरांचा विकास करता आला नाही, असा आरोप विरोधकांकडून होत आहे. आता याच समस्यांना घेऊन विरोधक पुन्हा एकदा प्रस्थापितांना कोंडीत पकडण्याची शक्यता आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजांवर लक्ष देणाऱ्या उमेदवाराला मतदार झुकते माप देणार का, याकडे लक्ष राहणार आहे.

## २०१६ साली शेवटचे मतदार, आता आकडा ४ लाखांवर

२७ नोव्हेंबर २०१६ साली नगर पालिका निवडणुकीसाठी शेवटचे मतदान झाले होते, तेव्हा या सहा नगरपालिकांत ३ लाख १७ हजार १९८ एवढे मतदार होते. यंदा यात १ लाख ३१९ ने वाढ झाली असून, आता हा आकडा ४ लाख १७ हजार ५१७ वर पोहचला आहे. २०१६ नंतर थेट २०२५ मध्ये ही निवडणूक होत आहे. जवळपास ९ वर्षांनंतर होणाऱ्या या निवडणुकीत इतक्या मोठ्या प्रमाणात मतदार वाढल्याने शहरातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## युती, आघाडीत होणार बिघाडी?

विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीत एकत्र असलेले नेते नगरपालिका निवडणुकीत बंडखोरी करण्याची शक्यता आहे. बीडच नव्हे, तर सर्वच शहरांमध्ये ही परिस्थिती आहे. आघाडीत बिघाडी होत आहे, तर युतीतही सूर जुळत नसल्याचे चित्र आहे. सध्या तरी प्रत्येकाने आपण स्वबळावर लढणार, अशी तयारी केल्याचे दिसत आहे. मात्र, पक्षश्रेष्ठींकडून काय आदेश येतो आणि तिकिट न मिळाल्यास कोण बंडखोरी करतो, यावर अंतिम राजकीय चित्र अवलंबून असेल. बंडखोरांमुळे प्रस्थापितांच्या 'विकेट्स' पडतात का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# ५ तारखेपासून मराठवाड्याच्या दौऱ्यावर, शेतकऱ्यांशी साधणार संवाद- उद्धव ठाकरे

मुंबई । दिव्य न्युज

येत्या ५ तारखेपासून मी मराठवाड्यात संवाद दौऱ्यावर जाणार आहे. शेतकऱ्यांशी मी थेट संवाद साधणार आहे. दिवाळीपर्यंत, दिवाळीच्या आत काही पैसे शेतकऱ्याला मिळतील असं पोकळ आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं होतं. काही हजार कोटी तिजोरीतून रिलीज केले असं ते म्हणतात, तर ते पैसे मिळाले का याबद्दल विचारणार आहे असे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सांगितले. नुसती आगपाखड करायला किंवा टीका करायला म्हणून मी जाणार नाही, पण ते पैसे मिळाले पाहिजेत अशी भूमिका त्यांनी मांडली. माध्यमांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे यांनी मराठवाड्यातील संवाद दौऱ्याची योजना मांडली. शेतकऱ्यांना मदत मिळाली का याची पाहणी करणार असल्याचेही उद्धव ठाकरे यांनी नमूद केलं.



जे पॅकेज जहीर केलं त्यातलं तरी काय मिळालं ?

आज शेतकऱ्याला बाकी मदतीची गरज आहेच पण सर्वात आधी ज्यांची जमीन खरडून गेली आहे, ती पूर्ववत करण्यासाठी ते पहिले माती मागत आहेत. ती मातीच जर त्यांना मिळाली नसेल तर पुढच्या गोष्टी कशा होणार ? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला. दर हेक्टरी ५० हजार रुपये ही शेतकऱ्यांची मागणी आहे, कर्जमुक्ती झालीच पाहिजे ही त्यांची मागणी आहे. इतरही अनेक बाबी आहे. मी शेतकऱ्यांना जाऊन भेटणार आहे. जे पॅकेज जाहीर केलं होतं,त्यातलं तरी किती मिळालं असा सवाल शेतकऱ्यांना विचारणार असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. आम्ही शेतकऱ्यांशी प्रामाणिकपणे वागलो, तसं हे सरकार का वागत नाही? असा सवाल उद्धव ठाकरेंनी विचारला.

खरडून गेलेल्या जमीनीला तीन-साडेतीन लाख मनरेगातून देणार होते. दिवाळीपूर्वी त्या ३ लाखातले १ लाख रुपये तरी शेतकऱ्याच्या खात्यात टाका, मग पुढे पैसे नंतर द्या अशी मागणी आम्ही काढलेल्या मोर्चादरम्यान मी केली होती. पण तेही पैसे दिलेत असं वाटत नाही. सरकार नेमकं काय करणार आहे ? आत्तापर्यंत घोषित झालेल्या पॅकेजपैकी शेतकऱ्याच्या हातात काय मिळालं हेही पाहणार असल्याचं उद्धव यांनी सांगितलं.

# ओझर नगरपरिषदेत स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी विविध शासकीय योजनांबाबत विशेष शिबिराचे आयोजन




ओझर । दिव्य न्युज :
जुबेर शेख ओझर

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ओझर नगरपरिषद आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांसाठी विविध शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन ओझर नगरपरिषद कार्यालयात करण्यात आले. या शिबिराचे आयोजन ओझर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. किरण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

शिबिरात प्रधानमंत्री आवास योजना, आयुष्मान भारत योजना, पीएम विश्वकर्मा योजना, पीएम स्व-निधी योजना, रमाई आवास योजना, पीएम सूर्य घर योजना, शासकीय विमा योजना तसेच सामाजिक सुरक्षा योजनांविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

मुख्याधिकारी श्री. किरण देशमुख यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, स्वच्छता कर्मचारी हे शहर स्वच्छतेचे खरे शिल्पकार असून शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्रत्येक कर्मचाऱ्यापर्यंत पोहोचविणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. यावेळी नगर अभियंता श्री. सुनील पाटील यांनी प्रधानमंत्री आवास योजना आणि रमाई आवास योजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच ओझर नगरपरिषदेच्या छणङच् विभागाचे शहर व्यवस्थापक डॉ. संदीप आगोणे यांनी इतर शासकीय योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती नीता गायकवाड आणि श्रीमती शारदा सोनवणे यांनी केले. शिबिरास उपमुख्याधिकारी श्रीमती स्नेहा फडतरे, कर अधिकारी श्री. प्रशांत पोतदार, नगर अभियंता श्री. सुनील पाटील, पाणीपुरवठा अभियंता श्री. राहुल शिंदे, स्थापत्य अभियंता श्रीमती जयश्री मोगल व श्री. अविनाश गवळे, विद्युत अभियंता श्री. शाहिद पठाण, सहायक नगर रचनाकार श्रीमती रेणुका पाटील व श्रीमती ऐश्वर्या वैरागर, रचना सहाय्यक श्री. केयुर राय, कर निरीक्षक श्री. राहुल कुटे, स्थापत्य अभियंता श्रीमती ऐश्वर्या सानप, अंतर्गत लेखापरीक्षक श्रीमती साधना ढेपले व श्रीमती साधना खराटे, लेखापाल श्री. कृष्ण गांगुर्डे, सहाय्यक कर निरीक्षक श्री. विकास फटांगरे आदींसह नगरपरिषदेचे कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला असून स्वच्छता कर्मचाऱ्यांनी या शिबिराचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# सीए अभ्यासक्रमाच्या फाउंडेशन, इंटरमीडिएट आणि अंतिम परीक्षांचा निकाल जाहीर



पुणे । दिव्य न्युज

इन्स्टिटच्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटन्ट्स ऑफ इंडियामार्फत (आयसीएआय) घेण्यात आलेल्या सनदी लेखापाल अभ्यासक्रमाच्या (सीए) फाउंडेशन, इंटरमीडिएट आणि अंतिम परीक्षांचा निकाल जाहीर झाला आहे. अंतिम परीक्षेत मध्य प्रदेशमधील धामनोड येथील मुकुंद अगीवाल देशात अव्वल ठरला आहे. फाऊंडेशन परीक्षेत चेन्नईची ए. राजलक्ष्मी, तर इंटरमिजिएट परीक्षेत जयपूरच्या नेहा खणवानी यांनी देशात पहिला क्रमांक पटकावला आहे. आयसीएआयने प्रसिद्धिपत्रकाद्वारे निकालाबाबतची माहिती दिली.

सप्टेंबरमध्ये झालेल्या सीए अंतिम परीक्षेसाठी ग्रुप एक मधून १२ हजार ८११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्याची टक्केवारी २४.६६ आहे. ग्रुप २ मधून ८ हजार १५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्याची टक्केवारी २५.२६ टक्के आहे. दोन्ही ग्रुपमधून २ हजार ७२७ विद्यार्थी उत्तीर्ण असून, उत्तीर्णाचे प्रमाण १६.२३ इतके आहे. अंतिम परीक्षेत मुकुंद अगीवाल हा ८३.३३ टक्के गुण मिळवून देशात पहिला आला. तर हैद्राबादलच्या तेजस मुदंडा याने द्वितीय, तर राजस्थानच्या बकुल गुप्ताने तिसरा क्रमांक मिळवला. इंटरमीडिएट परीक्षेच्या ग्रुप एक मधून ८ हजार ७८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्याची टक्केवारी ९.४३ आहे. ग्रुप २ मधून १८ हजार ९३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्याची टक्केवारी २७.१४ टक्के आहे. दोन्ही ग्रुपमधून ३ हजार ६६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्णांचे प्रमाण १०.०६ टक्के आहे. या परीक्षेत जयपूरची नेहा खणवाणी ही ६०० पैकी ५०५ गुणांसह देशात पहिली आली. तर, अहमदाबादची क्रिती शर्मा, मुंबईचा अक्षत नौटियाल याने देशात तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे. फाऊंडेशन परीक्षेत एकूण १४ हजार ६०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होण्याचे प्रमाण १४.७८ टक्के इतके आहे. त्यापैकी मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण १५.७४ टक्के, तर मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण १३.७६ टक्के आहे. फाऊंडेशन परीक्षेमध्ये देशातून चेन्नईची एल. राजलक्ष्मी ही ४०० पैकी ३६० गुण मिळवून अव्वल आली आहे. तसेच, सुरतचा प्रेम अगरवाल हा द्वितीय, तर मुंबईचा नील शहा याने तिसरा क्रमांक संपादन केला आहे.

# बीडवासीयांना रेशनमध्ये गव्हाऐवजी ज्वारी

## मात्र मिळते धुरळा-किडे असलेली ज्वारी; तहसीलदारांची भूमिका काय?








बीड । दिव्य न्युज

बीड जिल्ह्यातील नागरिकांना चालू महिन्यात रेशन दुकानांतून गव्हाऐवजी ज्वारी वाटपाची योजना सुरू करण्यात आली आहे. मात्र या ज्वारीच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. अनेक लाभार्थी आणि दुकानदारांच्या तक्रारींनुसार रेशन दुकानांवर मिळणाऱ्या ज्वारीत धुरळा, किटाणू, आणि इतर अशुद्ध घटक असल्याचे उघड झाले आहे. काही ठिकाणी ही ज्वारी इतकी निकृष्ट दर्जाची आहे की ती माणसांनी नव्हे तर जनावरांनाही देण्याजोगी नसल्याची चर्चा ग्रामीण भागात सुरू आहे.तीन महिन्यांच्या रेशनसाठी नागरिक दुकानांकडे धाव घेत आहेत, मात्र हातात मिळते ती दूषित ज्वारी. त्यामुळे बीड तालुक्यात नागरिकांत नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक दुकानदार या ज्वारीच्या गुणवत्तेविरोधात आवाज उठवत आहेत आणि काहींनी तर या ज्वारीचा साठा तहसील कार्यालयात परत करण्यासही सुरुवात केली आहे.नागरिकांच्या तक्रारींनुसार, या ज्वारीत केवळ धुरळा आणि किडेच नाहीत, तर काही ठिकाणी त्यात आळेही (worms) आढळल्याचे समजते. स्वस्त धान्याच्या नावाखाली अशी निकृष्ट ज्वारी दिली जाणे म्हणजे जनतेची निराशा आणि आरोग्य धोक्यात घालणारा प्रकार असल्याचे मत सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केले आहे.या सर्व गोंधळाच्या पार्श्वभूमीवर आता तहसीलदार काय भूमिका घेतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. बीडमधील प्रशासन या तक्रारींवर कार्यवाही करून योग्य आणि स्वच्छ धान्य लाभार्थ्यांना देण्याची व्यवस्था करत का, हे पुढील काही दिवसांत स्पष्ट होईल. नागरिक मात्र आत्ताच प्रशासनाकडून त्वरीत उपाययोजनांची मागणी करत आहेत

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०